# कोव्हिड-१९ केंद्रित आरोग्य विम्यासाठी फ्लिपकार्ट, आयसीआयसीआय आणि डिजिट इन्शुरन्स एकत्र

- दाव्याची सोपी-सुलभ प्रक्रिया, रुग्णालयीन खर्चाचे कवच, रुग्णालयातील खोली अथवा आयसीयू भाडे, रुग्णवाहिका साह्य आणि दूरध्वनीवरून मार्गदर्शन आदी लाभांचा समावेश
- दाव्यांसाठी डिजिटल प्रक्रिया, विमा खरेदी करताना वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही

**बंगळुरू, १० एप्रिल २०२० :** संपूर्णत: भारतात विकसित झालेली ई-कॉमर्स बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने आयसीआयसीआय लोंबार्ड आणि डिजिट इन्शुरन्स या आघाडीच्या विमा कंपन्यांसह आपल्या व्यासपीठाच्या माध्यमातून कोव्हिड-१९ पासून संरक्षण देणाऱ्या आरोग्य विमा योजना सुरू करत असल्याची घोषणा आज केली. या जागतिक साथीच्या संकटाशी मुकाबला करणाऱ्या ग्राहकांना आरोग्य विम्याचे संरक्षण देणाऱ्या या दोन समूह आरोग्य विमा योजनांमध्ये दावे तात्काळ निकाली निघणार असून योजना खरेदी करतेवेळी वैद्यकीय चाचणीची गरज नाही.

विमा क्षेत्राच्या अंदाजानुसार सुमारे ५६ टक्के भारतीय लोकसंख्येला कुठल्याही प्रकारच्या विम्याचे संरक्षण कवच नाही. ही बाब तसेच सध्याची गरज लक्षात घेऊन फ्लिपकार्टने आयसीआयसीआय लोंबार्ड आणि डिजिट इन्शुरन्स यांच्यासमवेत केलेल्या भागिदारीमुळे फ्लिपकार्टच्या वापरकर्त्यांना रुग्णालयीन खर्चासह सुलभरित्या दावे निकाली निघण्यापर्यंत अनेक लाभांचा समावेश असलेल्या विमा योजना मिळणार आहेत.

**'कोव्हिड-१९ प्रोटेक्शन कव्हर'** या आयसीआयसीआय लोंबार्डच्या योजनेअंतर्गत विमाधारकाला कोव्हिड-१९ची लागण झाल्याचे स्पष्ट होताच त्वरित २५ हजार रुपये मिळतात. अवघ्या १५९ रुपये वार्षिक प्रीमियममुळे सर्वांनाच परवडू शकेल अशी ही योजना आहे. याखेरीज, योजनेद्वारे आरोग्य साह्य लाभ, व्हर्च्युअल व टेली कन्सल्टेशन लाभ आणि रुग्णवाहिका साह्य आदी लाभही मिळतात. फ्लिपकार्टच्या ग्राहकांना मन:शांती देणारी बाब म्हणजे दावे निकाली काढण्याच्या प्रक्रियेसाठी प्रत्यक्ष कागदपत्रे (हार्ड कॉपी) दाखल न करता डिजिटल प्रती दाखल करण्याची मुभा आहे.

**'डिजिट इलनेस समूह विमा'** या डिजिट इन्शुरन्सच्या योजनेअंतर्गत विमाधारकाला अवघ्या ५११ रुपये वार्षिक प्रीमिअमच्या मोबदल्यात १ लाख रुपयांपर्यंत रुग्णालयीन खर्चापासून संरक्षण मिळते. याखेरीज, रुग्णालयातील खोली अथवा आयसीयूच्या भाड्याच्या रकमेबाबत कुठलीही मर्यादा नाही. योजनेत रुग्णालयात दाखल होण्याच्या ३० दिवस आधी आणि रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर ६० दिवसापर्यंतच्या खर्चाचेही कवच आहे. याव्यतिरिक्त, विमाधारक एकूण विमा रकमेच्या १ टक्के रक्कम रुग्णवाहिका सेवेसाठी देखील वापरू शकतो.

**फ्लिपकार्टच्या फिनटेक आणि पेमेंट्स ग्रुपचे प्रमुख रणजीत बोयानपल्ली** म्हणाले, *"कोव्हिड-१९शी आपण सर्वजण एकत्रपणे लढा देत असून भारतीय ग्राहकांसाठी हा कसोटीचा काळ आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर असल्यामुळे आरोग्यविषयक गरजा आणि लाभ ही आता अत्यावश्यक बाब बनली आहे. भारतात आरोग्य विम्याची व्याप्ती व प्रसार खूप कमी असल्यामुळे एकत्र येऊन विमा योजना अधिक सुलभरित्या उपलब्ध करून देणे ही या क्षेत्रातील संघटनांची जबाबदारी आहे. या कसोटीच्या काळात ग्राहकांच्या गरजा भागवणे ही आम्ही आमची जबाबदारी मानतो आणि या प्रयत्नांमध्ये आरोग्य विमा सेवा देखील अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारतातील दोन आघाडीच्या विमा कंपन्यांसमवेतच्या या भागिदारीमुळे ग्राहकांना अत्यावश्यक अशा आरोग्य विमा योजना उपलब्ध होतीलच, शिवाय अत्यंत कमी खर्चात आरोग्यविषयक गरजा भागवणेही शक्य होईल."*

**या भागिदारीबाबत आयसीआयसीआय लोंबार्डचे कार्यकारी संचालक संजीव मंत्री** म्हणाले, *“आमच्या ‘निभाये वादे’ या तत्वाला अनुसरून ग्राहकांना गरजेनुसार वेळच्या वेळी उपयुक्त योजना देणे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो. सध्याच्या परिस्थितीत कोव्हिड-१९ केंद्रित विमा योजना ही ग्राहकांच्या दृष्टीने अत्यंत सुयोग्य आहे. फ्लिपकार्टसमवेत भागिदारी करून रुग्णवाहिका सेवा आणि टेली कन्सल्टेशनसारख्या मूल्यवर्धीत लाभांसह अत्यंत किफायतशीर असे कोव्हिड-१९ प्रोटेक्शन कव्हर ही विमा योजना ग्राहकांसमोर आणताना आम्हाला आनंद होत आहे. त्याशिवाय, फ्लिपकार्टच्या ग्राहकांना श्रेणीतील सर्वोत्तम अशी दाव्यांशी संबंधित सेवा देण्यासाठी आमचे एंड-टु-एंड डिजिटाइज्ड कस्टमर सपोर्ट प्लॅटफॉर्म सक्षम आहे.”*

**डिजिट इन्शुरन्सच्या मुख्य वितरण अधिकारी जसलीन कोहली** म्हणाल्या, *“विम्याचे सुलभीकरण करून ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार विमा उत्पादन उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. सध्या जगभरात असलेल्या परिस्थितीचा विचार करता कोव्हिड-१९ पासून संरक्षण देणारी विमा योजना ग्राहकांसाठी उपलब्ध असणे गरजेचे असून याबाबत आमचे आणि फ्लिपकार्टचे विचार जुळतात ही आनंदाची बाब आहे. आमच्या या विमा योजनेत आयसीयू व रुग्णालयातील खोलीच्या भाड्यासह रुग्णालयीन उपचारांचा खर्चच नव्हे, तर रुग्णालयात दाखल होण्याच्या आधीचा, तसेच डिस्चार्ज मिळाल्यानंतरचा खर्च आणि रुग्णवाहिका सेवेच्या खर्चाचाही समावेश आहे. सुलभ विम्याद्वारे सध्याच्या कठिण परिस्थितीचा सर्वोत्तम पद्धतीने मुकाबला करता यावा, याला आमचे प्राधान्य आहे.”*

आयसीआयसीआय लोंबार्ड आणि डिजिट इन्शुरन्सच्या या विमा योजना आता फ्लिपकार्टच्या व्यासपीठावर उपलब्ध आहेत.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India’s leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India’s e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, driving access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India’s fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more details contact: media@flipkart.com**

**About ICICI Lombard**

ICICI Lombard is one of the largest non-life private insurers in India based on gross direct premium income in fiscal 2019. We offer our customers a comprehensive and well-diversified range of products, including motor, health, fire, personal accident, marine, engineering and

liability insurance, through multiple distribution channels. More details are available at www.icicilombard.com.

**For more details contact: seema.jadhav@icicilombard.com**

**About Digit**

Digit is a new-age general insurance company started by Kamesh Goyal and backed by the Fairfax Group, one of the largest financial services groups in the world. The company has raised three rounds of funding amounting to $140 million from Canadian billionaire Prem Watsa's Fairfax Financial Holdings and $84 million from three growth equity investors - A91 Partners, Faering Capital and TVS Capital. This combined investment would bring Digit's total funding to $224 million, one of the largest funding rounds in the Indian General Insurance space.

Headquartered in Bengaluru, Digit has partnered with some of the leading companies like Cleartrip, Sterling Holidays, SOTC and Policy Bazaar. Digit Insurance has recently won, 'General Insurance Company of the Year 2019' award at Asia Insurance Review Awards, Singapore. It has also featured in the Top 25 Indian Startups Lists by Linkedin in 2018 and 2019, and was in CB Insights' top 250 fastest-growing fintech companies globally list in 2018.

**For more details contact: mediarelations@godigit.com**